दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25
अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २१३ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | बुधवार ०२/०९/२०२६ । पाने - ६











# शनिवारचे 'मेंटेनन्स' तरी कशासाठी ? संगमनेरकर संतप्त

## वीजेचा लपंडाव कायमच; वारंवार वीज खंडित, व्यापारी आणि नागरिक हैराण

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरात दर शनिवारी आठवडा बाजार भरत असल्याने हा दिवस व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. मात्र, याच दिवशी महावितरणकडून 'मेंटेनन्स व दुरुस्ती'च्या नावाखाली तासनतास वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने व्यापारी आणि नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे शनिवारचा मेंटेनन्स संपल्यानंतरही संपूर्ण आठवडाभर वीज खंडित होण्याचे सत्र सुरूच राहत असल्याने 'दर शनिवारी नेमके कसले मेंटेनन्स केले जाते?' असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.



शहरातील मार्केट यार्ड आणि वॉटर वर्क्स फिडर अंतर्गत येणाऱ्या परिसरात दिवसातून तब्बल चार ते पाच वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. वारंवार होणारे तांत्रिक बिघाड, अचानक वीज जाणे-येणे तसेच कमी-अधिक दाबाने होणारा वीजपुरवठा यामुळे नागरिक आणि व्यापाऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

वीजेच्या लपंडावाचा सर्वाधिक फटका इलेक्ट्रॉनिक उपकरणांवर बसत आहे. घरातील टीव्ही, फ्रिज, संगणक, इन्व्हर्टर यांसह दुकानांमधील महागडी उपकरणे खराब होण्याचा धोका वाढला आहे. सुपरशॉपी, आईस्क्रीम पार्लर आणि इतर व्यावसायिकांना वारंवार वीज खंडित झाल्याने थेट आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. महावितरणच्या अनियमित वीजपुरवठ्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई कोण देणार, असा संतप्त सवाल व्यापाऱ्यांकडून केला जात आहे.

वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तक्रार नोंदविण्यासाठी महावितरणकडून ग्राहकांना दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मात्र, संबंधित क्रमांकावर संपर्क साधला असता फोन बंद असतो किंवा कॉलला प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. आपत्कालीन परिस्थितीत अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही प्रतिसाद मिळत नसल्याने नागरिकांचा संताप अधिकच वाढत आहे. या प्रकाराबाबत सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसारित करूनही समस्या कायम असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

बिल वसुलीत तत्परता, सेवा देताना उदासीनता?

थकीत वीजबिलाच्या वसुलीसाठी ग्राहकांना तत्काळ नोटिसा बजावून वीज जोडणी तोडण्याचा इशारा दिला जातो. मात्र, ग्राहकांकडून पै अन् पै वसूल करणाऱ्या महावितरणला त्याच ग्राहकांना नियमित आणि दर्जेदार वीजपुरवठा देणे का शक्य होत नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. वारंवार होणारे बिघाड, वीजेचा लपंडाव आणि अधिकाऱ्यांकडून मिळत नसलेला प्रतिसाद यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. वीजपुरवठ्याच्या या गंभीर समस्येवर तातडीने कायमस्वरूपी तोडगा न काढल्यास महावितरणच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी दिला आहे.

# खांडेश्वर मंदिरात प्रसाद गुंजाळला आमदार समर्थकांकडून मारहाण

## वर्षभरापूर्वी आ. खताळ यांच्यावर केला होता हल्ला

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -वर्षभरापूर्वी ऑगस्ट महिन्यात आमदार अमोल खताळ यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या घटनेची पुनरावृत्ती होता होता टळली. तिसऱ्या श्रावणी सोमवारी खांडेश्वर मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने गजबजलेला असताना आमदार खताळ यांच्यावर हल्ला करण्याच्या संशयावरून प्रसाद बापूसाहेब गुंजाळ या तरुणाला आमदार समर्थकांनी पकडून मारहाण केली. या प्रकारामुळे मंदिर परिसरात काही काळ मोठा गोंधळ निर्माण झाला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शहर पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत गुंजाळ याला ताब्यात घेतले.

आमदार अमोल खताळ हे खांडेश्वर मंदिरात येणार असल्याची पूर्वकल्पना संबंधित तरुणाला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून गुंजाळ हा आपल्या सोशल मीडिया खात्यावरून सूचक स्वरूपाचे संदेश देत असल्याची चर्चा आहे. मात्र, या बाबत पोलिसांना माहिती होती का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. दुसरीकडे, आमदार समर्थक मात्र सतर्क असल्याचे या घटनेवरून दिसून आले.

तिसरा श्रावणी सोमवार असल्याने पहाटेपासूनच खांडेश्वर मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. याचवेळी संशयित गुंजाळ मंदिर परिसरात वावरत असल्याचे आमदार समर्थकांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी त्याला पकडून मारहाण करण्यास सुरुवात केली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे भाविकांमध्येही काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मंदिर परिसरात बंदोबस्तासाठी उपस्थित असलेले शहर पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्यासह पोलिस कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत गुंजाळ याला ताब्यात घेतले आणि पोलीस ठाण्यात आणले.

दरम्यान, पोलीस ठाण्यात आल्यानंतर गुंजाळ याने आपण खांडगावचा स्थानिक नागरिक असून मंदिर परिसरात वावरणे गैर नसल्याचे सांगत आपली बाजू मांडली. तसेच, आपल्याला विनाकारण मारहाण करणाऱ्यांविरोधात तक्रार दाखल करण्याची भूमिका त्याने घेतल्याचे समजते. त्यामुळे संशयिताकडून प्रत्यक्ष कोणतेही कृत्य घडले नसल्यास त्याच्यावर कोणती कारवाई करायची आणि त्याचवेळी त्याला (पान २ )

# संगमनेरात रंगणार भक्तीचा महासोहळा !

## इस्कॉनतर्फे ४ सप्टेंबरला भव्य श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव

युवाववार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भगवान श्रीकृष्णांच्या जन्मोत्सवानिमित्त इस्कॉन संगमनेर यांच्या वतीने शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी संगमनेर येथे भव्य श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मालपाणी लॉन्स येथे सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत हा भक्तिमय सोहळा रंगणार असून शहर व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



जन्माष्टमी महोत्सवानिमित्त मालपाणी लॉन्स परिसर भक्ती आणि संकीर्तनाने दुमदुमणार आहे. यावेळी हरिनाम संकीर्तन, भक्तिगीते, श्रीकृष्ण महाअभिषेक, ५६ भोग अर्पण, आरती यांसह विविध आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

रुद्रनाथ प्रभुजींचे विशेष मार्गदर्शन - या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण श्रीमान रुद्रनाथ प्रभुजी यांचे विशेष मार्गदर्शन ठरणार आहे. इस्कॉन चौपाटी, मुंबई येथील वरिष्ठ भक्त असलेले रुद्रनाथ प्रभुजी यांनी आयआयटीमधून एम.टेक. पदवी प्राप्त केली आहे. भगवान श्रीकृष्णांच्या दिव्य लीलांवर तसेच त्यांच्या जीवनातील आध्यात्मिक संदेशावर ते भाविकांना मार्गदर्शन करणार आहेत. भगवान श्रीकृष्णांच्या जीवनातील विविध प्रसंग आणि बाललीलांवर आधारित विशेष सादरीकरणेही यावेळी करण्यात येणार आहेत. बालगोपालांसाठी आकर्षक उपक्रम, श्रीकृष्ण-राधा वेशभूषा, नृत्य आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे उत्सवाची रंगत आणखी वाढणार आहे. (पान २ वर)

# पुणे - नाशिक रेल्वेसाठी लढा निर्णायक टप्प्यात - आ. सत्यजीत तांबे

## तांत्रिक बाबींसह जनभावनाही तपासण्याची मागणी




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर - पुणे - नाशिक रेल्वेसाठी गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला संघर्ष आता अंतिम टप्प्यात आला असून, मार्ग बदलण्याच्या चर्चेला सुरुवात झाल्यापासून गेल्या दोन वर्षांत लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आपण मोठ्या प्रमाणावर लढा उभारला आहे. त्याचा परिणाम म्हणून केंद्र व राज्य सरकारने या प्रश्नाच्या तांत्रिक बाबी तपासण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन केली असून, समितीने ६० दिवसांत निर्णय द्यावा, अशी आपली ठाम मागणी असल्याचे आमदार सत्यजीत तांबे यांनी सांगितले.

### ६० दिवसांपैकी २५ दिवस संपले समितीने नेमके केले काय ?

**काकोडकर समिती स्थापन होऊन जवळपास २५ दिवस झाले आहेत. समितीला ६० दिवसांची मुदत दिली असताना त्यातील २५ दिवस संपले; मात्र अद्याप कोणत्याही हालचाली दिसत नाहीत. आम्ही डॉ. अनिल काकोडकर यांच्याशी संपर्क साधला असता, 'शासनाने अद्याप मला कळवलेच नाही,' असे त्यांनी सांगितले. एवढी दिरंगाई होत असेल तर ही बाब जनतेसमोर आली पाहिजे.**

माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, फेब्रुवारीतील अर्थसंकल्पीय अधिवेशनात आपण पुणे - नाशिक रेल्वेचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ.अनिल काकोडकर यांच्या नेतृत्वाखाली तज्ज्ञ समिती स्थापन करून नारायणगाव परिसरातील जीएमआरटीच्या प्रकल्पाचा रेल्वेमार्गावर नेमका किती परिणाम होतो, यासह तांत्रिक बाबी तपासल्या जातील, असे आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर चार-पाच महिने समिती स्थापन न झाल्याने ९ ऑगस्ट रोजी क्रांती दिनाच्या निमित्ताने आंदोलनाची घोषणा करण्यात आली. त्यानंतर ६ ऑगस्ट रोजीच राज्य शासनाने काकोडकर समिती स्थापन करण्याचा शासन निर्णय काढला. या समितीत अनिल काकोडकर यांच्यासह रेल्वे बोर्डाचे अधिकारी तसेच पुणे व नाशिक विभागाचे आयुक्तांचा समावेश आहे. (पान २ वर)










# साकूरच्या बिरोबा देवस्थानाच्या विकासाचा 'रोडमॅप' तयार

## आमदार सत्यजीत तांबे यांनी घेतला कामांचा आढावा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - साकूर आणि परिसरातील नागरिकांशी असलेले आपले नाते केवळ राजकीय स्वरूपाचे नसून, येथील श्रद्धास्थानांशीही आपले भावनिक नाते असल्याचे सांगत आमदार सत्यजीत तांबे यांनी साकूरच्या विकासकामांना सातत्याने प्राधान्य देण्याची भूमिका मांडली. तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त साकूर येथील श्री विरभद्र बिरोबा देवस्थानला भेट देऊन त्यांनी बिरोबारायांचे दर्शन घेतले.

बिरोबाराया हे पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या जागृत देवस्थानची सेवा करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी श्रद्धेची बाब आहे. संधी मिळेल तेव्हा साकूर जिल्हा परिषद गटासाठी पहिल्या प्राधान्याने काम करणे हा माझा कायम हेतू राहिला आहे, असे तांबे यांनी यावेळी स्पष्ट केले.

बिरोबारायांशी आपले जुने नाते असल्याचे सांगताना तांबे यांनी २०१२ सालच्या जिल्हा परिषद निवडणुकीच्या काळापासूनचा संदर्भ दिला. देवस्थानला भेट दिल्यानंतर सेवा करण्याची भावना आपोआप निर्माण होते आणि केलेल्या सेवेची पोचपावती बिरोबाराया देतात, हा आपला आजवरचा अनुभव असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, देवस्थान परिसरातील सुरू असलेल्या विकासकामांची तांबे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या ५० लाख रुपयांच्या निधीतून दर्शन रांगा तसेच अन्य कामे सुरू आहेत. यापूर्वी देवस्थान परिसरात २० लाख रुपयांच्या खर्चातून भक्तनिवास उभारण्यात आला असून जिल्हा परिषदेकडूनही १५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

देवस्थानला भेट देणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असल्याने त्यांच्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जात असल्याचे तांबे यांनी सांगितले. २०२३ मध्ये आमदार झाल्यानंतर देवस्थानच्या विकासासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. मात्र, ठेकेदारांची काही देयके रखडल्याने कामांना अडथळे आले असून काही कामे अपूर्ण राहिली आहेत. निधी उपलब्ध होत जाईल, त्यानुसार उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

बिरोबा देवस्थानच्या भविष्यातील विकासासाठी सुमारे ३ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असल्याची माहितीही तांबे यांनी दिली. बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातून या आराखड्यातील कामे टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. सरकारच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीचा संदर्भ देत तांबे यांनी निधीच्या उपलब्धतेबाबतही भूमिका मांडली. नवीन कामांना मंजुरी देण्यापूर्वी आधीच सुरू असलेली आणि निधीअभावी रखडलेली कामे पूर्ण करण्याला सरकारने प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शंकरराव खेमनर, थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजित खेमनर, युवा नेते बाळासाहेब सागर, सरपंच सचिन सोनवणे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# दैनिक युवावार्ता हर हर महादेव अंकाचे कौतुक

## खांडेश्वर, रामेश्वर, बाळेश्वर, निझर्णेश्वर मंदिरात प्रकाशन



**श्रीक्षेत्र रामेश्वर येथे दैनिक युवावार्ता हर हर महादेव विशेषांकाचे प्रकाशन करताना उपविभागीय अधिकारी अरूण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, स्वदेश उद्योग समुहाचे संस्थापक बाळासाहेब देशमाने, रामेश्वर देवस्थान समितीचे अध्यक्ष सुनिल देशमुख, सचिव दत्ता कासार, उपाध्यक्ष विजय कोल्हे व उपसंपादक संजय आहिरे दिसत आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर- श्रावणातील तिसऱ्या सोमवारनिमित्त दैनिक युवावार्तानें तालुक्यातील चार शक्तिपीठांचे महत्व विशद करणारा हर हर महादेव हा विशेषांक प्रकाशित केला आहे. श्रावणी सोमवार निमित्त तालुक्यातील खांडगाव येथील श्री क्षेत्र खांडेश्वर, धांदरफळ येथील श्री क्षेत्र रामेश्वर, निझर्णेश्वर आणि बाळेश्वर मंदिरात विविध मान्यवरांच्या हस्ते या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी व भाविकांनी या विशेषांकाचे कौतुक केले. श्रावणी सोमवारनिमित्त संगमनेर तालुक्यासह अकोले, सिन्नर, राहाता, जुन्नर व पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने या चारही तीर्थक्षेत्रांना भेट देतात. या देवस्थानचा गेल्या काही वर्षांत विविध योजनांच्या माध्यमातून सुंदर विकास झाला असून वृक्षारोपणामुळे परिसर निसर्गरम्य झाला आहे. या देवस्थानचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या ठिकाणी मोठे योगदान दिले त्यामुळे या सर्वांच्या कामाची दखल या विशेषांकात घेण्यात आली आहे.

# परदेशात फिरायला जाऊ नका, विदेशात लग्नसोहळे टाळा, गरज असेल तरच सोनं घ्या

## ७.८% विकासदर; आत्मनिर्भरतेचा मोदींचा संदेश



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

भारतीय अर्थव्यवस्थेने चालू आर्थिक वर्षातील एप्रिल ते जून या तिमाहीत ७.८ टक्के इतका विकास दर नोंदवल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी देशवासियांचे आभार मानले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी मंगळवारी सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर करत देशवासियांशी संवाद साधला. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी देशवासियांना एक महत्त्वाचे आवाहन केले. देशाचा आर्थिक विकासदर सध्या चांगला आहे. ही गती कायम ठेवायची असेल तर आपल्याला स्वदेशी आणि आत्मनिर्भर भारत या दोन धोरणांचा अधिकाअधिक अवलंब करावा लागेल. त्यासाठी परदेशातील प्रवास टाळा. विदेशात जाऊन लग्नसोहळे करणे टाळा, असा सल्ला पंतप्रधान मोदी यांनी दिला. तसेच गरज नसेल तर सोनं खरेदी करु नका, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

भारतीय अर्थव्यवस्थेने ७.८ टक्के इतका आर्थिक विकासाचा दर नोंदवला. यासाठी देशवासियांना खूप खूप शुभेच्छा. संपूर्ण देश आनंदाने भरुन गेला आहे. हे जनतेच्या पुरुषार्थ, संकल्पशक्ती आणि सामूहिक शक्तीचे प्रतीक आहे. संपूर्ण जग युद्धात बुडालं आहे. चारही बाजूंनी संकटांच्या बातम्या येत आहेत. जगभरातील पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. कोरोनानंतर जगभरात कुठेही स्थिरता नाही. तरीही भारत इतक्या वेगाने प्रगती करत आहे. भारतामधील निराशेच्या गर्तेत बुडालेले काही लोक 'झुठ की गुंज'च्या माध्यमातून चारही दिशांना अपप्रचार करत आहेत. मात्र, या सगळ्याला पार करुन, हे निराशेचे वातावरण भेदून भारतीय अर्थव्यवस्थेने ७.८ टक्के इतका आर्थिक विकासदर नोंदवला.

# भोजापूर प्रकल्पाच्या पूरचारीला नदीजोड प्रकल्पाचा आधार

## ३५ पाझर तलाव भरणार; ६०६.६३ हेक्टर क्षेत्राला मिळणार सिंचनाचा दिलासा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील दुष्काळी भागासाठी वरदान ठरणाऱ्या भोजापूर मध्यम प्रकल्पाच्या पूरचारीचा समावेश दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्पात करण्याच्या प्रस्तावाला महायुती सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे भोजापूर पूरचारीद्वारे परिसरातील सुमारे ३५ पाझर तलाव व विविध जलसाठे भरून देण्यात येणार असून, ६०६.६३ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

संगमनेर आणि सिन्नर तालुक्यातील दुष्काळी गावांसाठी भोजापूर मध्यम प्रकल्प महत्त्वाचा मानला जातो. या प्रकल्पावर अवलंबून असलेल्या २७ गावांचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याच्या दृष्टीने भोजापूर प्रकल्पाचा दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड योजनेत समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यासंदर्भातील प्रस्ताव गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाकडे सादर करण्यात आला होता. त्याला आता मान्यता मिळाल्याने भोजापूर पूरचारीसाठी ४ दशलक्ष घनमीटर पाणी प्रस्तावित करण्यात आले आहे.



या पाण्याच्या माध्यमातून भोजापूर लाभक्षेत्रातील दुष्काळी गावांमधील जलसाठे भरण्याबरोबरच मोठे क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा जलसंपदा विभागाचा प्रयत्न आहे. चिंचोली गुरव, पिंपळे, सोनेवाडी, नान्नजदुमाला, सोनोशी, पोखरी हवेली, तळेगाव, करुले, तिगाव आदी गावांतील अंदाजे ३५ पाझर तलाव व जलसाठ्यांना याचा लाभ होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे पश्चिमवाहिनी नद्यांचे अतिरिक्त पाणी गोदावरीच्या तुटीच्या खोऱ्यात वळविण्याच्या नदीजोड प्रकल्पाला गती मिळत आहे. त्याचाच एक भाग म्हणून भोजापूर प्रकल्पाला नदीजोड योजनेशी जोडण्याचा निर्णय दुष्काळी भागासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

दरम्यान, भोजापूर पूरचारीच्या कामासाठी यापूर्वीच मंत्री विखे पाटील यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यामुळे चारीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. आता नदीजोड प्रकल्पातून पाणी उपलब्ध होणार असल्याने दुष्काळी भागातील पाझर तलाव आणि जलसाठे भरण्याबरोबरच शेतीच्या सिंचनाला मोठा आधार मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# धुळे-जळगाव दौऱ्यात थोरातांकडून पवार, खडसेंचे कौतुक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर/धुळे/जळगाव : काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी धुळे व जळगाव जिल्ह्यांचा दौरा केला. या दौऱ्यात विविध कार्यक्रम व कार्यकर्त्यांच्या बैठकांना उपस्थित राहताना त्यांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

धुळे येथे इतिहासाचार्य वि. का. राजवाडे इतिहास संशोधन मंडळाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमास थोरात उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, खासदार डॉ. अमोल कोल्हे, मंत्री जयकुमार रावल यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना थोरात यांनी राजवाडे इतिहास संशोधन मंडळाच्या कार्याचे कौतुक केले. इतिहास जतन करणे, त्याचे संशोधन व दस्तऐवजीकरण करणे हे मोठे आव्हान असून, मंडळाने गेल्या शंभर वर्षांत मौलिक काम केले आहे, असे त्यांनी सांगितले. शरद पवार यांनीही या संस्थेला सातत्याने आधार दिल्याचे त्यांनी नमूद केले.

शरद पवार यांच्या कार्याचा गौरव करताना थोरात म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात पवार यांनी विविध क्षेत्रांत मोठे योगदान दिले. प्रश्नांची जाण ठेवून त्यावर योग्य तोडगा काढणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे.

मुक्ताईनगर येथे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते एकनाथराव खडसे यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यासही थोरात उपस्थित होते. यावेळी त्यांनी खडसे यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याचा गौरव केला. १९९० पासून विधिमंडळात कार्यरत असलेल्या खडसे यांनी माणसे जोडण्याचे काम केले असून, तापी खोरे विकास महामंडळाच्या निर्मितीत त्यांचे योगदान असल्याचे थोरात यांनी सांगितले. यावेळी शरद पवार यांनीही खडसे यांच्या राजकीय योगदानाचा उल्लेख केला. महाराष्ट्रात भाजपची संघटनात्मक वाढ करण्यात खडसे यांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी शरद पवार यांच्या पुरोगामी विचारांचा गौरव केला. महाराष्ट्राची वाटचाल त्यांच्या प्रेरणेतून पुढे नेण्याचे आवाहन त्यांनी केले. या दौऱ्यात थोरात यांनी चोपडा येथे अरुण गुजराथी यांच्या निवासस्थानी भेट, तसेच जळगाव, पारोळा आणि धुळे येथे काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या. या बैठकांना विविध पक्षांचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास संगमनेरचे डॉ. संतोष खेडलेकर उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. संजय मालपाणी यांनी केले.

पान १ वरून - **खांडेश्वर मंदिरात प्रसाद...**

झालेल्या मारहाणीच्या तक्रारीबाबत काय भूमिका घ्यायची, या पेचात पोलीस सापडले आहेत.

दरम्यान, २८ ऑगस्ट रोजी वर्षभरापूर्वी संगमनेर फेस्टिव्हलच्या उद्घाटन सोहळ्यात मालपाणी लॉन्स येथे उपस्थित असलेल्या आमदार अमोल खताळ यांच्यावर प्रसाद बापूसाहेब गुंजाळ याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी उपस्थित नागरिकांनी गुंजाळ याला पकडून मारहाण केली होती. त्यानंतर खासगी सुरक्षारक्षक आणि पोलिसांनी हस्तक्षेप करून त्याला नागरिकांच्या तावडीतून सोडवले होते.

या प्रकरणात काही काळ कारागृहात राहिल्यानंतर सध्या तो जामिनावर बाहेर असल्याचे समजते. वर्षभरापूर्वीच्या या घटनेमुळे संगमनेरसह संपूर्ण जिल्ह्याचे राजकारण चांगलेच ढवळून निघाले होते. आरोपीच्या मोबाईल तपासणीत त्याचा संबंध एका माजी मंत्र्यांच्या स्वीय सहायकापर्यंत असल्याचे समोर आल्यानंतर या प्रकरणाला राजकीय रंगही प्राप्त झाला होता.

आता पुन्हा त्याच तरुणाचा खांडेश्वर मंदिर परिसरातील वावर आणि आमदार समर्थकांनी केलेली मारहाण यामुळे संगमनेरमध्ये चर्चेला उधाण आले आहे. पोलिसांच्या तपासानंतर या संपूर्ण प्रकारामागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

पान १ वरून - **पुणे - नाशिक रेल्वेसाठी लढा निर्णायक...**

९ ऑगस्टच्या आंदोलनात समितीला ६० दिवसांचीच मुदत द्यावी आणि त्यापेक्षा मुदतवाढ देऊ नये, तसेच केवळ तांत्रिक बाबींचा विचार न करता स्थानिक नागरिकांच्या भावना जाणून घेण्यासाठी जनसुनावणी घ्यावी, अशा दोन प्रमुख मागण्या करण्यात आल्या होत्या. या दोन्ही मागण्या सरकारने मान्य करून त्याबाबत लेखी आश्वासन दिल्याचे तांबे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, केंद्र सरकारकडून पुणे - नाशिक रेल्वे रद्द झाल्याचे यापूर्वी जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर शिर्डी-अहिल्यानगर मार्गे रेल्वे नेण्यासंदर्भातील गॅझेट प्रसिद्ध झाल्याने पुणे-नाशिक रेल्वेचा मार्ग बदलल्याच्या बातम्या समोर आल्या. मात्र, काकोडकर समिती आता स्थापन झाली असून, तिच्या अहवालाची आपण प्रतीक्षा करीत आहोत.

पुणे - नाशिक रेल्वेचा पूर्वीचा मार्ग कायम राहावा, ही आपली प्रमुख मागणी आहे. मात्र, नाशिक - शिर्डी तसेच अहिल्यानगर - पुणे हे रेल्वेमार्ग करण्यास आपला विरोध नाही. हे मार्ग अधिक थेट झाल्यास प्रवाशांचा वेळ वाचणार आहे. परंतु, हे नवीन मार्ग करताना अनेक वर्षांपासूनची पुणे-नाशिक रेल्वेची मागणी बाजूला सारण्याचा प्रयत्न सरकारने करू नये, अशी आमची माफक अपेक्षा आहे, काकोडकर समिती स्थापन होण्यापूर्वीच्या निर्णयाच्या आधारे आलेल्या बातम्यांमुळे संभ्रम निर्माण झाला आहे. आता समिती स्थापन झाली असून तिला ६० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे सरकारवर विश्वास ठेवून समितीच्या निर्णयाची प्रतीक्षा करू आणि पुणे-नाशिक रेल्वेसाठीचा संघर्ष पुढेही सुरू ठेवू, असेही आमदार सत्यजीत तांबे यांनी स्पष्ट केले.

# महत्त्वाकांक्षी विकास प्रकल्पाचा मार्ग मोकळा

## ऐतिहासिक वारसा जपत पर्यटन सुविधांचा होणार कायापालट



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- शहराच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष असलेल्या भुईकोट किल्ल्याच्या विकासाचा रखडलेला मार्ग आता मोकळा झाला आहे. भुईकोट किल्ला विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन आणि नगर लष्कर विभाग यांच्यात सामंजस्य करार (चजण) संपन्न झाला. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि स्टेशन कमांडर पी. सुनील कुमार यांच्या उपस्थितीत अहिल्यानगर येथील लष्कराच्या मुख्यालयात हा करार करण्यात आला. या करारामुळे किल्ल्याच्या संवर्धनासोबतच पर्यटनाच्या दृष्टीने प्रस्तावित विविध विकासकामांना प्रत्यक्ष गती मिळणार आहे.

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून भुईकोट किल्ल्याचा विकास करण्याची घोषणा केली होती. भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी यासाठी विशेष पुढाकार घेत सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नातून केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या 'स्वदेश दर्शन २.०' योजनेअंतर्गत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला १७ मार्च २०२५ रोजी प्रशासकीय आणि वित्तीय मंजुरी मिळाली होती.

मात्र, भुईकोट किल्ला लष्कराच्या अखत्यारीत असल्याने प्रत्यक्ष विकासकामे सुरू करण्यासाठी लष्कराची अंतिम परवानगी आवश्यक होती. या प्रक्रियेमुळे प्रकल्पाला विलंब झाला. आता महाराष्ट्र शासन आणि नगर लष्कर विभागामध्ये सामंजस्य करार झाल्याने विकासकामांच्या अंमलबजावणीतील महत्त्वाचा अडथळा दूर झाला आहे. भुईकोट किल्ल्याच्या ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन करताना पर्यटकांसाठी आधुनिक आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन या प्रकल्पात करण्यात आले आहे.

पान १ वरून - **संगमनेरात रंगणार भक्तीचा...**

हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण, हरे हरे; हरे राम, हरे राम, राम राम, हरे हरे या महामंत्राच्या सामूहिक संकीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिमय होणार आहे. भाविकांना सामूहिक नामस्मरणातून आध्यात्मिक आनंदाचा अनुभव घेता येणार आहे.

श्रीकृष्ण जन्माष्टमी हा केवळ धार्मिक उत्सव नसून प्रेम, भक्ती, करुणा, सदाचार आणि धर्माचा संदेश देणारा उत्सव आहे. भगवान श्रीकृष्णांच्या शिकवणीचा प्रसार तसेच समाजामध्ये भक्तीमय आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने इस्कॉन संगमनेरच्या वतीने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाच्या समारोपप्रसंगी श्रीकृष्णाची विशेष आरती करण्यात येणार असून त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

संगमनेर शहर व परिसरातील नागरिकांनी कुटुंबीयांसह या भव्य श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवात सहभागी होऊन भक्ती, संकीर्तन आणि श्रीकृष्णनामाचा आनंद घ्यावा, असे आवाहन इस्कॉन संगमनेरच्या वतीने करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# केंद्रप्रमुख रवींद्र अनाप यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण- पद्मश्री खेडकर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सेवानिवृत्ती ही केवळ पदावरून असते माणसांच्या मनातून कधीच नाही. रवींद्र अनाप यांनी आपल्या कार्यातून आणि माणुसकीच्या वागणुकीतून अनेकांच्या मनात कायमचे स्थान निर्माण केले असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष पद्मश्री रघुवीर खेडकर यांनी केले.

संगमनेर खुर्द व आश्वी बुद्रुक केंद्राचे केंद्रप्रमुख रवींद्र बाबुराव अनाप यांच्या सेवापूर्तीनिमित्त खांडेश्वर सांस्कृतिक भवन, खांडगाव येथे सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात पार पडला. संगमनेर खुर्द केंद्रातील शिक्षकांनी स्वयंस्फूर्तीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमास शिक्षक, अधिकारी, शिक्षक नेते, आप्तेष्ट व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राथमिक शिक्षक म्हणून सुरू झालेला रवींद्र अनाप यांचा सेवाप्रवास पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक आणि केंद्रप्रमुख या विविध जबाबदाऱ्यांपर्यंत पोहोचला. संगमनेर खुर्द केंद्रासोबतच आश्वी बुद्रुक केंद्राचा कार्यभारही त्यांनी समर्थपणे सांभाळला. प्रशासकीय कामकाजाचा अनुभव, शैक्षणिक क्षेत्राची जाण, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि निर्णयक्षमता या गुणांमुळे त्यांनी आपल्या कार्याची स्वतंत्र ओळख निर्माण केली. केंद्रप्रमुख म्हणून काम करताना शिक्षकांशी आपुलकीने संवाद साधणे, त्यांना विश्वासात घेऊन निर्णय घेणे आणि सहकार्याची भूमिका ठेवणे, ही त्यांच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये ठरली. तंत्रस्नेही स्वभावामुळे अनेक प्रशासकीय व तांत्रिक कामे त्यांनी स्वतः हाताळली. त्यामुळे शिक्षकांना शैक्षणिक कामावर अधिक लक्ष केंद्रित करता आले. अधिकाराच्या पदावर असतानाही सहकाऱ्यांशी जपलेले सौजन्य, आपुलकी आणि माणुसकी हीच त्यांच्या कार्याची मोठी ओळख ठरली. शिक्षक संघटनेच्या माध्यमातूनही त्यांनी सक्रिय भूमिका बजावली. 'ऐक्य' संघटनेच्या माध्यमातून शिक्षकांच्या प्रश्नांवर त्यांनी ठामपणे भूमिका मांडली. शिक्षक बँकेच्या विविध प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग घेताना त्यांचा विरोध हा व्यक्तीविरोधी न राहता चांगली व्यवस्था आणि शिक्षकांच्या हितासाठी राहिला. मतभेद असतानाही वैयक्तिक संबंधांमध्ये सौजन्य जपण्याची भूमिका त्यांनी कायम ठेवली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील नवले यांनी केले. सूत्रसंचालन नंदू राहणे यांनी केले. अध्यक्षीय सूचना सुदाम भागवत यांनी मांडल्या, तर नीलिमा देशमुख यांनी अनुमोदन दिले.

# मनोज जरांगे यांची प्रकृती खालावली

## सरकार दरबारी मोठ्या हालचाली



जालना (वृत्तसंस्था)

मराठा आरक्षण आणि कुणबी जात प्रमाणपत्रासाठी मनोज जरांगे पाटील आक्रमक झाले आहे. सरकारला वेळ देऊनही कुणबी प्रमाणपत्र रद्द होत असल्याच्या नाराजीने त्यांनी उपोषणाचा हाक दिली. २९ ऑगस्टपासून ते उपोषणाला बसले आहेत. आज उपोषणाचा चौथा दिवस आहे. त्यांची प्रकृती खालावली आहे. आज कॅबिनेटची बैठक होत आहे. या बैठकीत जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाविषयी चर्चा होणार आहे. दरम्यान डॉक्टरांचं पथक त्यांच्या तपासणीसाठी दाखल झाले. मनोज जरांगे यांना उठवण्याचा प्रयत्न केला जात आहे. आम्हाला बीपी तपासायची आहे. मात्र जरांगे यांनी पथकाला कोणताही प्रतिसाद दिला नाही. डॉक्टरांनी तपासणीची विनंती केली. रात्रीपासून त्यांनी तपासणीसाठी नकार दिला आहे. मनोज जरांगे यांनी हाताने नाही म्हणून सांगितलं. तपासणीसाठी मनोज जरांगे यांनी नकार दिला.आम्ही त्यांना वारंवार विनंती करत आहोत. त्यांनी तपासणी करण्यास नकार दिला आहे. आमची वैद्यकीय तपासणी टीम इथेचं आहे आम्ही दर दोन तासाला येवून त्यांना विनंती करू. काल आम्ही तपासणी केल्यावर बीपी १३० आणि शुगर ७० च्या आसपास होती. आम्ही त्यांना विनंती करत आहोत, असे वैद्यकीय अधिकारी विजय वाकोडे यांनी माहिती दिली.

मनोज जरांगे पाटलांच्या उपोषण आंदोलनाच्या समर्थनार्थ नांदेडमध्ये अनोखे आंदोलन पाहायला मिळाले. १०० फूट उंच जलकुंभावर बसून आमरण उपोषण सुरू करण्यात आले. मराठा सेवक लक्ष्मण कदम आणि ओमप्रकाश कदम यांच आमरण उपोषण सुरू केले आहे. हदगाव तालुक्यातील निवघा बाजार येथील जलकुंभावर बसून आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे. राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून ५० हजार रुपये हेक्टरी मदत देण्याची मागणी आंदोलकांनी केली आहे. उपोषणस्थळी पोलिसांचा तगडा बंदोबस्त दिसून आला.

# चुलत भावाच्या डोक्यात दगड घालून हत्या केलेल्या आरोपीला जन्मठेप

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : दारूच्या नशेत झालेल्या वादातून चुलत भावाच्या डोक्यात व तोंडावर दगडाने वार करून त्याची हत्या केल्याप्रकरणी आरोपी काशिनाथ रामनाथ बिहे यास संगमनेर जिल्हा व अतिरिक्त सत्र वायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली. सेच ५० हजार रुपये दंड आणि दंड न बल्यास तीन महिन्यांची अतिरिक्त शिक्षा नावण्यात आली. जिल्हा व अतिरिक्त सत्र याधीश व्ही. जी. गव्हाणे यांनी सोमवार ३१ ऑगस्ट रोजी हा निकाल दिला.

याप्रकरणी इंदुबाई बारकू गिडे यांनी अकोले पोलीस ठाण्यात दि. ६ ऑक्टोबर २०२२ रोजी फिर्याद दिली होती. फिर्यादीनुसार दि. ५ ऑक्टोबर २०२२ रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास आरोपी काशिनाथ हा दारू पिऊन त्यांच्या घराच्या दारात आला. त्याने बारकु यांच्याबाबत शिवीगाळ करत त्यांना जिवंत सोडणार नसल्याचे सांगितले.

काही वेळाने बारकु हे घरी आले असता आरोपीने झटापट करीत त्यांना घराच्या दाराजवळील ओटयाजवळ खाली पाडले. त्यानंतर जवळ पडलेला मोठा दगड उचलून त्यांच्या डोक्यावर व तोंडावर चार ते पाच वेळा जोरदार प्रहार केले. या हल्ल्यात बारकु गंभीर जखमी होऊन जागीच पडले. नागरिकांनी त्यांना अकोले येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले.

या घटनेप्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक मिथुन घुगे यांनी करून आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. खटल्याच्या सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने एकूण सात साक्षीदार तपासले. त्यामध्ये फिर्यादी इंदुबाई गि-हे, त्यांची पुतणी सविता केरु पारधे, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेखा एस. करवंदे आणि तपासी अधिकारी यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष, वैद्यकीय पुरावे आणि सरकारी पक्षाचा प्रभावी युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकारी पक्षातर्फे ॲड. भानुदास कोल्हे यांनी काम पाहिले. पैरवी अधिकारी म्हणून महिला पोलीस शितल तोरकडी व म.पो. स्वाती नाकईवाडी यांनी सरकारी वकिलांना सहकार्य केले.

# अमृतवाहिनीमध्ये 'एआय'वर राष्ट्रीय कार्यक्रम

युवावार्ता (प्रतिनधी)

संगमनेर - संगमनेर : अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या संगणक अभियांत्रिकी विभागातर्फे ७ ते १२ सप्टेंबर २०२६ दरम्यान कृत्रिम बुद्धिमत्ता व मोठ्या भाषिक प्रारूपांवर आधारित राष्ट्रीय प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या सर एम. विश्वेश्वरय्या सभागृहात हा कार्यक्रम होणार असून, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून ३.५० लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. बावीस्कर यांनी दिली.

'जनरेटिव्ह कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मोठी भाषिक प्रारूपे : रचना, विकास आणि वास्तविक जीवनातील उपयोग' हा कार्यक्रमाचा मुख्य विषय आहे. शिक्षण, संशोधन आणि उद्योग क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर झपाट्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर प्राध्यापक व संशोधकांना एआयमधील नवीन तंत्रज्ञान, साधने आणि त्यांचे प्रत्यक्ष उपयोग याबाबत अद्ययावत ज्ञान मिळावे, हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यक्रमात जनरेटिव्ह एआयची मूलतत्त्वे, प्रभावी सूचना लेखन तंत्र, मोठ्या भाषिक प्रारूपांवरील अनुप्रयोग, आधुनिक एआय साधने, प्रारूप विकास, वास्तविक जीवनातील उपयोग, उद्योग क्षेत्रातील एआयचा वापर आणि संशोधनातील कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका यांसह विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तज्ज्ञांची व्याख्याने, प्रात्यक्षिके आणि संवादात्मक सत्रांमुळे सहभागी प्राध्यापकांना एआयचा प्रत्यक्ष वापर समजून घेण्याची संधी मिळणार आहे. या कार्यक्रमात सुमागो इन्फोटेक प्रा. लि., नाशिक यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व सहसंस्थापक सौ. सोनाली गोर्डे, एमईएसच्या वाडिया अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डॉ. शर्मिला किशोर वाघ, ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्युशनचे संतोष उगले व अशोक पोमणार, मिटू रिसर्चचे तुषार बी. कुटे, नेटलीप आयटी सोल्युशनच्या मृणाल दहाळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. तसेच एमईटी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, नाशिक येथील डॉ. पी. एम. यावलकर, एसएनजेबी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, चांदवडचे डॉ. महेश संघवी, जीवन परिवर्तन प्रशिक्षक डॉ. निलेश छल्लारे आणि क्लाउडेरा, बंगळुरू येथील गणेश लाड हेही विविध विषयांवर आपले ज्ञान सहभागींसोबत शेअर करणार आहेत.कार्यक्रमाचे समन्वयक तथा संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. एस. के. सोनकर असून, सहसमन्वयक डॉ. ए. एस. थोरात आहेत. प्राचार्य डॉ. पी. आर. बावीस्कर यांच्या नेतृत्वाखाली नियोजन करण्यात आले आहे

# ऐतिहासिक दुधेश्वर गडाला 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा द्या

## भाविक, इतिहास अभ्यासक आणि ट्रेकर्सची राज्य शासनाकडे आग्रही मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात निमगावजाळी परिसरात वसलेला ऐतिहासिक श्री क्षेत्र दुधेश्वर गड सध्या भाविक, निसर्गप्रेमी आणि तरुण ट्रेकर्सच्या आकर्षणाचे केंद्र बनला आहे. अकराव्या शतकाचा ऐतिहासिक वारसा, पौराणिक महत्त्व आणि कळसूबाई डोंगररांगेतील विहंगम निसर्गसौंदर्य लाभलेल्या या प्राचीन शिवस्थानाला शासनाने तातडीने 'क' वर्ग तीर्थक्षेत्र तसेच पर्यटनस्थळाचा दर्जा द्यावा, अशी मागणी भाविक, ग्रामस्थ, इतिहास अभ्यासक आणि ट्रेकर्समधून जोर धरत आहे.

**कळसूबाई रांगेतील शेवटचे उंच शिखर**

सह्याद्री पर्वतरांगेची उपरांग असलेल्या कळसूबाई डोंगररांगेतील हे शेवटचे टोक मानले जाते. दुधेश्वर गडाच्या पूर्वेकडील सलग डोंगररांग येथे संपत असल्याने भौगोलिकदृष्ट्याही या ठिकाणाला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे गडाने गिर्यारोहक आणि ट्रेकर्सना मोठी भुरळ घातली आहे.

डोंगराच्या पायथ्यापासून मंदिरापर्यंत अवघ्या २५ मिनिटांत पायी चढून पोहोचता येत असल्याने तरुणाईमध्ये या ठिकाणाची लोकप्रियता वाढत आहे. अहिल्यानगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, संगमनेर, लोणी, कोपरगाव, राहाता आणि श्रीरामपूर परिसरातून दर आठवड्याला मोठ्या संख्येने ट्रेकर्स येथे येत आहेत. पावसाळ्यात धुक्याची चादर आणि हिरवाईने नटलेला परिसर युट्यूबर्स, व्लॉगर्स आणि सोशल मीडिया वापरकर्त्यांचे विशेष आकर्षण ठरत आहे.

**जागृत स्वयंभू शिवस्थानाची आख्यायिका**

दुधेश्वर महादेव हे जागृत व स्वयंभू देवस्थान असल्याची भाविकांची श्रद्धा आहे. एका गवळी बांधवाची गाय डोंगरावर चरत असताना एका ठिकाणी शिवलिंगावर दुधाची धार सोडत असल्याचे दिसून आले. त्यानंतर या ठिकाणी शिवलिंग असल्याचे लक्षात आल्याची आख्यायिका सांगितली जाते. त्यावरून या देवस्थानाला 'श्री क्षेत्र दुधेश्वर' असे नाव पडल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येते.

शांत, प्रसन्न आणि प्रदूषणमुक्त वातावरणामुळे येथे वर्षभर भाविकांची वर्दळ असते. श्रावण महिना तसेच महाशिवरात्रीच्या काळात मात्र भाविकांची मोठी गर्दी होत असते.

**लोकवर्गणीतून रस्ता, पायऱ्यांची उभारणी**

दुधेश्वर गडाच्या विकासासाठी स्थानिक ग्रामस्थ आणि भाविकांनी लोकवर्गणीतून रस्ता व पायऱ्यांची व्यवस्था केली आहे. निमगाव जाळी ते लोहारे रस्त्यावरून गडाच्या पायथ्यापर्यंत वाहनाने जाता येते. मात्र दिवसेंदिवस वाढणारी भाविक आणि पर्यटकांची संख्या लक्षात घेता पायाभूत सुविधांचा नियोजनबद्ध विकास करण्याची गरज निर्माण झाली आहे.

गडावरील पायऱ्यांचे मजबुतीकरण, सुरक्षित रेलिंग, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहे, कचरा व्यवस्थापन, प्रकाश व्यवस्था तसेच सुरक्षित पर्यटनासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी होत आहे. शासनाकडून मंजूर निधीतील तांत्रिक अडचणी दूर करून विकासकामांना गती देण्याची गरजही व्यक्त होत आहे.

**नीलफलकातून इतिहास जतन करण्याचा प्रयत्न**

सरदार त्रिंबकजी डेंगळे यांच्या १९६ व्या पुण्यतिथीनिमित्त इतिहास अभ्यासक डॉ. विजय वदक आणि सुमित डेंगळे यांच्या संकल्पनेतून तसेच गावातील गोविंदा उद्योगसमूहाच्या सहकार्याने दुधेश्वर गडावर नीलफलक बसविण्यात आला आहे.

या नीलफलकाच्या माध्यमातून दुधेश्वरच्या अकराव्या शतकातील प्राचीन इतिहासाची माहिती पर्यटक आणि भाविकांपर्यंत पोहोचण्यास मदत होत आहे. अशा उपक्रमांमुळे ऐतिहासिक वारशाचे जतन आणि नव्या पिढीत इतिहासाबद्दलची जिज्ञासा वाढण्यास हातभार लागणार आहे.

**पर्यटन विकासाला मोठी संधी**

धार्मिक श्रद्धा, प्राचीन इतिहास, सह्याद्रीचे निसर्गसौंदर्य आणि ट्रेकिंगचा अनुभव या चारही बाबी एकाच ठिकाणी उपलब्ध असल्याने दुधेश्वर गडाला पर्यटनाच्या दृष्टीने मोठी क्षमता आहे. शासनाने 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा दिल्यास या परिसरातील मूलभूत सुविधांचा विकास होण्याबरोबरच स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात.

**इतिहास, श्रद्धा आणि निसर्गाचा त्रिवेणी संगम**

अकराव्या शतकाचा ऐतिहासिक वारसा, जागृत शिवस्थानाची श्रद्धा आणि सह्याद्रीच्या निसर्गरम्य कुशीत वसलेला दुधेश्वर गड हा संगमनेर तालुक्याच्या पर्यटन नकाशावर महत्त्वाचे स्थान निर्माण करू शकतो. त्यामुळे शासनाने या ठिकाणाची धार्मिक व ऐतिहासिक ओळख जपत 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन नियोजनबद्ध विकास करावा, अशी जनभावना दिवसेंदिवस तीव्र होत आहे.

**नीलफलकाच्या माध्यमातून अकराव्या शतकातील प्राचीन वारसा जतन होण्यास आणि जनजागृती वाढण्यास मोठी मदत होईल.**

**– सुमित डेंगळे, इतिहास संशोधक**

**दुधेश्वर परिसराचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी शासनाने या ठिकाणाला तातडीने 'क' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मंजूर करावा. रस्ता, पाणी आणि इतर मूलभूत सुविधांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.**

**– डॉ. विजय वदक, इतिहास अभ्यासक**

**व्यायाम आणि आध्यात्मिक शांतता यांचा सुंदर मेळ म्हणजे दुधेश्वर डोंगर. या गडाची नित्य परिक्रमा आणि पायी चढाई आरोग्यासाठीही उपयुक्त ठरते.**

**– सिताराम चांडे, ज्येष्ठ पत्रकार**

# राज्यस्तरीय शिक्षक पुरस्काराने दिलीप हरी पिचड यांचा गौरव



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर- पिंपरकणे येथील शिक्षक दिलीप हरी पिचड यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय तसेच क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत 'लोकनेते बाळासाहेब थोरात गुणवंत पुरस्कार २०२६-२७' अंतर्गत राज्यस्तरीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जाणिव फाऊंडेशन यांच्या वतीने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लहानुभाऊ गुंजाळ पाटील यांनी अध्यक्षस्थान भूषविले.कार्यक्रमास आमदार सत्यजित तांबे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमास मा. ना. बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, अमित अर्जुनराव पार्टणकर, बाळासाहेब बबनराव हेंडे तसेच मातृतीर्थ अमृत शिंदे यांच्या उपस्थित हा पुरस्कार देण्यात आला शिक्षक दिलीप पिचड यांचे शिक्षण क्षेत्रासह सामाजिक, राजकीय व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेत त्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

या गौरवाबद्दल अकोले तालुक्यातील शिक्षण क्षेत्रातील सहकारी, विद्यार्थी, पालक तसेच डॉ गौरम बिडवे विठ्ठल पिचड भाऊसाहेब पिचड .युवराज थिगळे दुर्योधन आढळ ,भास्कर थिगळे, लहू गवारी चिंतामण पिचड , विश्वनाथ चौधरी , विलास सावंत मुख्याध्यापक कचरे आदी नागरिकांकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

# संपादकीय...

## वाहतूक कोंडीचा विळखा

संगमनेर शहराचा विस्तार झपाट्याने होत असताना वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, बसस्थानक परिसर, मुख्य रस्ते आणि उपनगरांकडे जाणाऱ्या मार्गांवर वारंवार होणारी वाहतूक कोंडी आता नित्याचीच बाब झाली आहे. काही मिनिटांच्या कामासाठी घराबाहेर पडलेल्या नागरिकांना कधी कधी अर्धा-अर्धा तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागते. विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी, रुग्णवाहिका, शेतकरी आणि सामान्य वाहनचालक अशा सर्वांनाच या समस्येचा फटका बसत आहे. वाहतूक कोंडी ही केवळ गैरसोय राहिलेली नसून, ती शहराच्या विकासातील गंभीर अडथळा बनली आहे. संगमनेर हे तालुक्याचे प्रमुख व्यापारी आणि शैक्षणिक केंद्र आहे. त्यामुळे शहरात दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिकांची आणि वाहनांची ये-जा होते. ग्रामीण भागातून बाजारपेठ, शासकीय कार्यालये, रुग्णालये, महाविद्यालये आणि विविध व्यावसायिक आस्थापनांसाठी नागरिक शहरात येतात. त्यातच वाढती दुचाकी, चारचाकी वाहने, मालवाहतूक करणारी वाहने आणि रिक्षांची संख्या यामुळे रस्त्यांवरील ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र, वाहनांची संख्या वाढत असताना त्यानुसार वाहतूक नियोजन आणि रस्त्यांची क्षमता वाढविण्याकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले गेले आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो. वाहतूक कोंडीमागे केवळ वाहनांची वाढती संख्या हे एकमेव कारण नाही. रस्त्यांच्या कडेला होणारे अनधिकृत पार्किंग, हातगाड्या, दुकानांसमोरील अतिक्रमणे, बेशिस्त वाहनचालक, चुकीच्या पद्धतीने रिक्षा थांबविणे आणि गर्दीच्या ठिकाणी मालवाहतूक वाहनांची होणारी वर्दळ ही कारणेही तितकीच महत्त्वाची आहेत. अनेक ठिकाणी रस्त्याची उपलब्ध जागा पार्किंगमध्येच जाते. परिणामी वाहतुकीसाठी उरलेली जागा कमी होते आणि एखाद्या वाहनाने नियम मोडला की त्याचा परिणाम काही क्षणांत संपूर्ण वाहतूक व्यवस्थेवर होतो. सिग्नल व्यवस्था हा वाहतूक नियंत्रणाचा महत्त्वाचा भाग आहे. मात्र, सिग्नल बसविणे आणि वाहतूक सुरळीत होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. सिग्नलची वेळ, वाहनांची संख्या, चौकाची रचना आणि पर्यायी मार्ग यांचा शास्त्रीय अभ्यास करूनच वाहतूक नियंत्रणाची यंत्रणा उभारली पाहिजे. केवळ सिग्नल लावल्याने प्रश्न सुटत नाही. उलट चुकीच्या नियोजनामुळे एखाद्या चौकातील कोंडी पुढच्या चौकापर्यंत पोहोचू शकते. शहरातील बसस्थानक परिसर आणि प्रमुख चौकांमध्ये वाहतूक कोंडीचा प्रश्न अधिक तीव्र होतो. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, रिक्षा थांबे, प्रवाशांची गर्दी आणि खासगी वाहनांची वर्दळ यांचे योग्य नियोजन झाले नाही, तर परिस्थिती आणखी बिकट होणार आहे. उत्सव, सण, आठवडी बाजार किंवा विशेष कार्यक्रमांच्या काळात तर या समस्येचे स्वरूप अधिक गंभीर होते. अशा वेळी वाहतूक पोलिसांची अतिरिक्त नियुक्ती, तात्पुरते पार्किंग, एकेरी वाहतूक आणि पर्यायी मार्गांची आखणी याबाबत पूर्वनियोजन असणे आवश्यक आहे. वाहतूक कोंडीचा सर्वात गंभीर परिणाम आपत्कालीन सेवांवर होतो. रुग्णवाहिका कोंडीत अडकली तर काही मिनिटांचा विलंबही रुग्णाच्या जीवासाठी महत्त्वाचा ठरू शकतो. अग्निशमन दलाचे वाहन किंवा पोलिसांचे वाहन वेळेत घटनास्थळी पोहोचले नाही, तर त्याचे परिणाम किती गंभीर असू शकतात, याची कल्पना करणेही कठीण आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेकडे केवळ वाहनचालकांची सोय म्हणून पाहणे चुकीचे आहे. ती नागरिकांच्या सुरक्षिततेशी थेट संबंधित बाब आहे. या समस्येवर उपाय करण्यासाठी प्रशासनाने आता तात्पुरत्या मलमपट्टीऐवजी दीर्घकालीन वाहतूक आराखडा तयार करण्याची गरज आहे. शहरातील प्रमुख चौकांचे सर्वेक्षण करून वाहनांची संख्या, गर्दीची वेळ, पार्किंगची गरज आणि रस्त्यांची क्षमता यांचा अभ्यास झाला पाहिजे. आवश्यक ठिकाणी नो-पार्किंग क्षेत्र निश्चित करणे, अतिक्रमणांवर कारवाई करणे, रिक्षा व मालवाहतूक वाहनांसाठी स्वतंत्र थांबे तयार करणे, सार्वजनिक पार्किंगची व्यवस्था करणे आणि पर्यायी मार्ग विकसित करणे गरजेचे आहे.


**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ मृत्यू नोंद/६१७/२०२६ दिनांक - १८/०८/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. विजय राजु ठाकुर रा. कोकणगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक १९/०६/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. कोकणगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची आई नामे **ममता राजु ठाकुर** यांचा **मृत्यू मौजे घुलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०१/०९/२००६** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **मृत्यू** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी घुलेवाडी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी घुलेवाडी यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


# खांडगाव महादेव मंदिरात प्रसाद वाटप



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : तिसऱ्या श्रावण सोमवारनिमित्त युवासेना संगमनेर व शिवभक्ती फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने श्री खांडगाव महादेव मंदिरात भाविकांसाठी प्रसाद वाटप करण्यात आले. सकाळी ७.३० ते दुपारी १२.३० या वेळेत झालेल्या या उपक्रमाचा शेकडो शिवभक्तांनी लाभ घेतला.

संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोलभाऊ खताळ पाटील यांनी मंदिरात उपस्थित राहून महादेवाचे दर्शन घेतले व उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी युवासेना उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशील शेवाळे, शहराध्यक्ष सार्थक शेवाळे यांच्यासह प्रतीक जांभळे, संकेत वैद्य, अवी गुंजाळ, गणेश चिंचवणे, कुलदीप पवार, अनिकेत अभंग, रोहन गुंजाळ, ओम अभंग, अथर्व गुंजाळ, विशाल जोशी, अनिकेत चांगले, तन्मय पाबळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

श्रावण महिन्यात धार्मिकतेसोबतच सेवाभावाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# अँग्लो उर्दूच्या माजी पर्यवेक्षिका साबेरा कलादगी 'सिस्टर' यांचे निधन

संगमनेर- अँग्लो उर्दू ज्युनिअर कॉलेजच्या माजी पर्यवेक्षिका व ज्येष्ठ शिक्षिका साबेरा मुश्ताक कलादगी (सिस्टर) यांचे वयाच्या ८१व्या वर्षी अल्पशा आजाराने नाशिक येथील खासगी रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या निधनाने संगमनेरच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

साबेरा कलादगी यांनी एम.ए., बी.एड. शिक्षण घेत १९६८ मध्ये पती मुश्ताक कलादगी यांच्यासोबत संगमनेर गाठले. अँग्लो उर्दू हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणून त्यांनी सेवेला सुरुवात केली. संस्थेच्या पहिल्या महिला शिक्षिका व पहिल्या पर्यवेक्षिका म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. इतिहास व भूगोल विषयाच्या तज्ज्ञ शिक्षिका म्हणूनही त्यांची ओळख होती.

विद्यार्थी, पालक आणि स्नेही त्यांना प्रेमाने 'सिस्टर' म्हणून संबोधत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत. २००१ मध्ये निवृत्त झाल्यानंतर त्यांनी धार्मिक व सामाजिक कार्याला वाहून घेतले. मुलींचे शिक्षण, सत्य-अहिंसा आणि सामाजिक सलोखा यासाठी त्या सातत्याने प्रबोधन करीत राहिल्या. मृदुभाषी स्वभाव, साधी राहणी आणि उच्च चारित्र्य यामुळे त्यांनी सर्वांच्या मनात आपले स्थान निर्माण केले होते.

त्यांच्या पश्चात पती मुश्ताक कलादगी, मुले मुजीब व अतीक, दोन सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

# निवृत्त सफाई कामगार लता जेधे यांचा नगरपालिकेतर्फे सन्मान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहराच्या आरोग्य विभागात सफाई कर्मचारी म्हणून प्रदीर्घकाळ सेवा बजावून नुकत्याच निवृत्त झालेल्या मातोश्री लता लाला जेधे यांचा संगमनेर नगरपालिकेच्या वतीने सन्मान करण्यात आला. नगरपालिकेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे आणि लोकनियुक्त नगराध्यक्षा डॉ. सौ. मैथलीताई तांबे यांच्या हस्ते जेधे यांना हार, शाल, साडी व ट्रॉफी (सन्मानचिन्ह) देऊन गौरविण्यात आले. यावेळी नगराध्यक्षांच्या हस्ते एक लाख रुपयांचा धनादेशही प्रदान करण्यात आला.

या सन्मान सोहळ्यास उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, तसेच नगरसेवक किशोर पवार, घनशाम जेधे, दिलीप शेठ पुंड, विश्वासराव मुर्तडक, किशोर टोकसे, गणेश गुंजाळ, नितीन अभंग, जगदीश (विजू) नरवाल यांच्यासह महिला नगरसेविका आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

लता जेधे यांनी आपल्या सेवाकाळात संगमनेर शहराच्या स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेत योगदान दिल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. त्यांच्या निवृत्तीच्या निमित्ताने करण्यात आलेल्या या गौरवामुळे जेधे परिवाराने नगरपालिका प्रशासन, नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक-नगरसेविका आणि उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले. दरम्यान, या संपूर्ण प्रक्रियेत संगमनेर वाल्मीक समाज, तसेच रवींद्र सुरेश कंडारे (राज्य अध्यक्ष, म.रा.स.क.स.), ड. संग्राम जोंधळे आणि श्रमिक संघ, संगमनेर नगरपरिषद सफाई कर्मचारी संघटना यांचे मार्गदर्शन, सहकार्य व मोलाची मदत लाभल्याचे जेधे परिवाराने सांगितले. या सर्वांच्या योगदानाबद्दल परिवाराच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

# साहित्यिक व व्यंगचित्रकार अरविंद गाडेकर यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : साहित्य आणि व्यंगचित्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे साहित्यिक व व्यंगचित्रकार अरविंद गाडेकर यांना जाणीव फाउंडेशन, संगमनेर यांच्या वतीने 'लोकनेते बाळासाहेब थोरात गुणगौरव सोहळ्या'त कला विभागातील राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार आमदार सत्यजित तांबे (सदस्य,विधान परिषद )यांच्या हस्ते गाडेकर यांना आज दिमाखदार सोहळ्यात प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष साहित्यनिर्मितीबरोबरच व्यंगचित्रांच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला.

अरविंद गाडेकर हे साहित्यिक, संपादक आणि व्यंगचित्रकार म्हणून कार्यरत असून आपल्या लेखणीसोबतच कुंचल्यातूनही सामाजिक प्रश्नांवर भाष्य करीत आहेत. त्यांच्या व्यंगचित्रांमधून मोबाईलचा अतिवापर, सायबर फसवणूक, व्यसनाधीनता, पर्यावरण, सामाजिक विसंगती, कुटुंबातील संवादाचा अभाव अशा विविध विषयांवर प्रभावीपणे प्रबोधन केले जाते. त्यांच्या 'व्यंगचित्रातून प्रबोधन' या उपक्रमालाही समाजमाध्यमांवर मोठा प्रतिसाद मिळत आहे.

या पुरस्कार सोहळ्याच्या व्यासपीठावर खांडेश्वर देवस्थानचे अध्यक्ष लहानभाऊ गुंजाळ, समाजसेवक राजाभाऊ अवसक, अमृत उद्योगचे मारुतीशेठ शिंदे, आदिवासी सेवक बाबा खरात, अभिजित पाटणकर, यांच्यासह विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर उपस्थित होते.पुरस्कार निवड समिती सदस्य उपस्थितीत होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जाणीव फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब हेंद्रे, कार्याध्यक्ष अमित पाटणकर, गोरक्षनाथ मदने,अंतोन मिसाळ, तसेच जाणीव फाउंडेशनच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. साहित्य आणि व्यंगचित्र या दोन्ही क्षेत्रांत सातत्याने सामाजिक भान जपत कार्य करणाऱ्या अरविंद गाडेकर यांना मिळालेल्या या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल साहित्यिक, कलाप्रेमी, मित्रपरिवार व नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


**SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL**

**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
MANDABAI RAJARAM PANSARE
TO NEW NAME
MANDA JAGANNATH PAWASE
BY AFFIDAVIT NO 1207/2026 DATE 29/08/2026
ADD- D,9/49, SAKHAR KARKHANA, AMRUTNAGAR,A/PGHULEWADI, SANGAMNER, DIST.AHILAYANAGAR- 422608

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
PRASAD SHYAM KAWADE
TO NEW NAME
PRASAD SHAM KAWADE
BY AFFIDAVIT NO 1209/2026 DATE 31/08/2026
ADD- MALDAD ROAD, GALLI NO,4, AYODHYA NAGAR, SANGAMNER, DIST.AHILAYANAGAR-422605

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
पुरूष – ४ जागा (वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १ M
जाहिरात व्यवस्थापक - १ M
डिझायनर - १ M/F
टेलिकॉलर - १ M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२,९३७०७७३५०४

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**नोकरीची सुवर्णसंधी**
श्री गणेश टायर्स
अकाऊंटंट - १
टॅली, जीएसटी ज्ञानास प्राधान्य
सेल्स एक्झीक्युटिव्ह - १
बॅटरी व इंजिन ऑईलच्या विक्री क्षेत्रातील अनुभव
अनुभावानुसार आकर्षक पगार
पत्ता - तीन बत्ती चौक, संगमनेर
८९९९८६२७५९

**कामासाठी मुले, मुली पाहिजेत**
अकाऊंटंट - १ (म.)
हेल्पर - १ (पु.)
सेल्समन - १ (पु./ म.)
कामाचा अनुभव आवश्यक
9422905155
9763232269

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**बालाजी गॅस, संगमनेर पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर
(२ जागा, १ महिला, १ पुरूष)
योग्य पगार व इतर सवलती
- संपर्क -
8600828485
9370025610

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
AAMRIN HASANBHAI BAGWAN
NEW NAME AS
AAMRIN MUSAHEEB BAGWAN
ADD – 1268 ,NAVGHAR GALLI , BAGWANPURA, SANGAMNER TAL - SANGAMNER DIST- AHMEDNAGAR

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

SR THORAT — JOB — GAGANGIRI

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com






FinanCity
**WE ARE HIRING !**
JOIN OUR GROWING TEAM
Build your career with Financity and grow with the best.
APPLICATION DEADLINE: 31ST AUGUST 2026

BACK OFFICE - 25 POSITIONS(FEMALE)
- Data Entry & Documentation
- Report Preparation
- Office Support Tasks
— ELIGIBILITY — Any Graduate(Freshers & Experienced both can apply)

ADMIN / HR2 POSITIONS(FEMALE)
- HR Generalist Role
- Employee Coordination
- HR Documentation
— ELIGIBILITY — Any Graduate(Freshers & Experienced both can apply)

SALES MANAGER5 POSITIONS(MALE)
- Field Visit & Client Meeting
- New Client Acquisition
- Sales Target Achievement
— ELIGIBILITY — Any Graduate(Freshers & Experienced both can apply)

12TH PASS CANDIDATES CAN ALSO APPLY
APPLY NOW !
Send your CV / Resume or call us now
9834087762 / 9623532907
Address: Seva Setu Kendra, Near Gravy Yard Hotel, Akole Bypass Road, Sangamner 422605.

# राज्यस्तरीय आदर्श शाळा व शिक्षक पुरस्कारांसाठी प्रस्तावांचे आवाहन



युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर- राष्ट्रपती पारितोषिक विजेते सोमनाथ कळसकर गुरुजी प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी प्रदान करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय आदर्श शाळा व आदर्श शिक्षक पुरस्कारांची यंदाची घोषणा करण्यात आली आहे. राज्यातील दोन जिल्हा परिषद शाळा आणि दोन उपक्रमशील जिल्हा परिषद शिक्षकांना या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. पात्र शाळा व शिक्षकांनी पुरस्कारासाठी आपले प्रस्ताव पाठवावेत, असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामनाथ कळसकर व प्रकल्प प्रमुख ज्ञानेश्वर गोंटे यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या जिल्हा परिषद शाळांचा गौरव करणे, तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नावीन्यपूर्ण प्रयोग राबविणाऱ्या शिक्षकांच्या कार्याला प्रोत्साहन देणे, हा या पुरस्काराचा मुख्य उद्देश आहे.

पुरस्काराचे स्वरूप - राज्यातील २ जिल्हा परिषद शाळा, जिल्हा परिषद शाळांमधील २ उपक्रमशील शिक्षक

निवडीचे निकष - गुणवत्तापूर्ण शिक्षण, शाळेचा भौतिक व शैक्षणिक विकास, लोकसहभाग, डिजिटल व नावीन्यपूर्ण उपक्रम तसेच विद्यार्थ्यांची पटसंख्या टिकवून ठेवण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न या बाबींचा प्रामुख्याने विचार केला जाणार आहे. पुरस्कारासाठी पात्र शाळा व शिक्षकांनी राबविलेल्या उपक्रमांचा सविस्तर अहवाल, छायाचित्रे आणि आवश्यक पुराव्यांसह विहित नमुन्यातील प्रस्ताव तातडीने प्रतिष्ठानकडे पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# डॉ. प्रकाश वाकचौरे यांना राज्यस्तरीय 'इच्छापूर्ती आरोग्य रत्न पुरस्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - आरोग्य सेवा, आरोग्य जनजागृती आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणारे डॉ. प्रकाश वाकचौरे यांना राज्यस्तरीय 'इच्छापूर्ती आरोग्य रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. इच्छापूर्ती प्रतिष्ठानच्या वतीने शिर्डी येथे आयोजित भव्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांचा सन्मान करण्यात आला.

या सोहळ्यास ह.भ.प. अक्षय महाराज भोसले (अध्यक्ष, धर्मवीर आध्यात्मिक सेना), ह.भ.प. पांडुरंग गिरीजी महाराज वावीकर, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकेकर, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, माजी मंत्री तथा माजी आमदार बबनरावजी घोलप, माजी आमदार चंद्रशेखर कदम पाटील, कमलाकर पाटील, सागर साठे, अभिनेत्री प्रतीक्षा आगळे आणि अभिनेत्री सुनीता पोते यांची प्रमुख उपस्थिती होती. अकोले मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून डॉ. वाकचौरे यांनी ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांसाठी विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविले आहेत. गावोगावी मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिरे, रक्तदान शिबिरे आणि रक्तदान जनजागृती अभियान, महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिरे, तसेच हृदयरोग निदान व प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले.

याशिवाय विविध शासकीय आरोग्य व सामाजिक योजनांची नागरिकांमध्ये जनजागृती, वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन, विद्यार्थी आणि युवकांसाठी करिअर मार्गदर्शन, ग्रामीण भागातील शाळा तसेच सामाजिक ग्रंथालयांना दर्जेदार पुस्तके भेट देऊन वाचन संस्कृतीला चालना देणे, असे विविध समाजोपयोगी उपक्रम त्यांनी सातत्याने राबविले आहेत. कोविड-१९ महामारीच्या काळात ग्रामीण भागात सातत्यपूर्ण आरोग्य सेवा आणि जनजागृती अभियान राबवून सर्वसामान्य नागरिकांना गुणवत्तापूर्ण, परवडणारी व जिव्हाळ्याची आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी केलेल्या कार्याची विशेष दखल घेत डॉ. वाकचौरे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. इच्छापूर्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष ह.भ.प. संपत काका जाधव, उपाध्यक्ष गणेश दादा भांड, हिंदू भूषण दत्ता पाटील गागरे, सतीश पाटील ढेकणे, संदीप पंडित तसेच पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष गोपाळ शिंदे यांच्या वतीने ही निवड करण्यात आली.

या पुरस्काराबद्दल डॉ. प्रकाश वाकचौरे यांचे विविध क्षेत्रातील मान्यवर, सहकारी आणि नागरिकांकडून अभिनंदन होत आहे. या प्रसंगी अकोले येथील डॉ. तुषार गावडे, डॉ. सचिन हाडवळे, डॉ. किरण कानवडे, डॉ. गणेश नवले आणि डॉ. अभिजित पावसे उपस्थित होते.

# भटक्या-विमुक्त महिलांनी शिक्षणाच्या माध्यमातून नवी झेप घ्यावी : दिशा पिंकी शेख



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- भटक्या-विमुक्त स्वातंत्र्य दिन २०२६ तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१व्या जयंती वर्षानिमित्त राष्ट्र सेवा दल, निर्मिती संस्था, लोक प्रबोधिनी आणि छात्रभारती यांच्या संयुक्त विद्यमाने संगमनेर येथे 'स्त्रीशक्ती सन्मान सोहळा' उत्साहात पार पडला. संगमनेर-अकोले तालुक्यात वंचित व उपेक्षित समूहांसाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ६० कर्तृत्ववान महिलांना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सन्मान' देऊन गौरविण्यात आले.

ज्ञानमाता विद्यालयात झालेल्या या कार्यक्रमात महिलांचे प्रश्न, शिक्षण, सामाजिक न्याय, शासकीय यंत्रणांची भूमिका तसेच भटक्या-विमुक्त समाजातील महिलांसमोरील सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक आव्हानांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय सचिव डॉ. सागर भालेराव यांनी केले. राष्ट्र सेवा दलाचे राज्य अध्यक्ष राजा कांदळकर यांनी सोहळ्यामागील सामाजिक भूमिका स्पष्ट केली. यावेळी बोलताना दिशा पिंकी शेख यांनी महिलांच्या सामाजिक स्थितीवर भाष्य करताना, महिला या कायम भटक्याच आहेत, असे प्रतिपादन केले. वर्णव्यवस्थेने महिलांना कायम दुय्यम स्थान दिले असून त्यांचा कोंडवाडा अद्याप पूर्णपणे सुटलेला नाही, असे त्यांनी सांगितले. विशेषतः भटक्या-विमुक्त समाजातील महिलांसमोर सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक आव्हानांचा मोठा डोंगर असल्याचे नमूद करत शिक्षणाशिवाय या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा प्रभावी मार्ग नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

उत्कर्षा रुपवते यांनी राज्य महिला आयोगाचे कामकाज, महिलांसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय यंत्रणा तसेच तक्रारींच्या निवारणाची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले. शासनाने 'लाडक्या बहिणीं'च्या प्रश्नांकडे परकेपणाची भावना न ठेवता संवेदनशीलतेने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. माजी शिक्षण उपसंचालक रमाकांत जाधव यांनी महिलांसह वंचित घटकांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक सुविधा व योजनांची माहिती दिली. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी उपलब्ध संधींचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. या सोहळ्यातील सर्वाधिक भावनिक क्षण ठरला तो नालेसफाई करताना मृत्यू झालेल्या अतुल रतन पवार आणि रियाज जावेद पिंजारी या दोन युवकांच्या मातांच्या सन्मानाचा. धोकादायक नालेसफाईच्या कामात दोन्ही युवकांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या मातांना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सन्मान' देऊन गौरविण्यात आले.

सन्मान स्वीकारताना वातावरण भावूक झाले. युवकांच्या कुटुंबीयांच्या दुःखाशी एकरूप होत उपस्थितांनी उभे राहून त्यांना मानवंदना दिली. यावेळी अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

वंचित आणि उपेक्षित समूहांसाठी प्रतिकूल परिस्थितीतही कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान हा केवळ पुरस्कार नसून त्यांच्या संघर्षाला, जिद्दीला आणि सामाजिक योगदानाला दिलेली मान्यता असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या धैर्य, कर्तृत्व, नेतृत्व आणि सामाजिक न्यायाच्या विचारांना अभिवादन करणाऱ्या या सोहळ्यातून भटक्या-विमुक्त महिलांच्या शिक्षणाचा, सन्मानाचा आणि सामाजिक हक्कांचा प्रश्न पुन्हा अधोरेखित झाला. महिलांनी शिक्षण, संघटन आणि सामाजिक सहभागाच्या माध्यमातून आपले स्थान अधिक सक्षम करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

# डिग्रस येथे बाबीर बुवाजी बाबा यात्रा महोत्सवाला उत्साहात सुरुवात

## विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील डिग्रज येथे श्रावण मासानिमित्त श्री क्षेत्र बाबीर बुवाजी बाबा यात्रा महोत्सवाला महंत १०८ बुवाजी दादा पुणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे. हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बुवाजी बाबांच्या दर्शनासाठी संपूर्ण पंचक्रोशीतून भाविक मोठ्या संख्येने दाखल होत असून, डिग्रज परिसर भक्तीमय वातावरणाने फुलून गेला आहे.

श्री क्षेत्र बुवाजी बाबा देवस्थानच्या प्रांगणात मंगळवारी सकाळी भव्य पालखी मिरवणुक काढण्यात आली. या पालखी सोहळ्यात अश्वनृत्य, ढोलनृत्य यांसह विविध पारंपरिक कार्यक्रम पार पडले. त्यानंतर बुधवारी उद्धव महाराज मंडलिक नेवासकर यांचे जाहीर हरी कीर्तन होणार आहे. तसेच भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, गजढोल नृत्य स्पर्धा व त्यानंतर देवाचा कार्यक्रम होणार आहे.

विशेष म्हणजे गाजरवाडी, निफाड, जिल्हा नाशिक येथून कावडी पायी दिंडी सोहळा बुवाजी बाबांच्या यात्रेसाठी येथे दाखल होत असतो. त्यामुळे या यात्रेला धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. यापूर्वी पालखी मिरवणुकीसाठी हत्ती आणण्यात आला होता, तर एका वर्षी देवाच्या पुष्पवृष्टीसाठी थेट निऱ्हाळे ता. सिन्नर बुवाजी बाबा देवस्थान येथून हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्यात आली होती. या वैशिष्ट्यपूर्ण आयोजनामुळे बुवाजी बाबांचा यात्रोत्सव भाविकांसाठी श्रद्धा, भक्ती आणि



आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. महंत उमाजी तात्या पुणेकर व भक्त परिवाराच्या मार्गदर्शनाखाली यात्रा महोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बुवाजी बाबांचे दर्शन घेत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन ओझर विविध कार्यकारी सोसायटीचे व्हाईस चेअरमन राहुल खेमनर व यात्रा आयोजकांनी केले आहे.

## दिनविशेष

१९९९: — भारतीय जलतरणपटू बुला चौधरी ह्या इंग्लिश खाडी दोन वेळा पोहणाऱ्या आशियातील पहिली महिला ठरल्या.

१९६०: — केंद्रीय तिबेटी प्रशासनाची पहिली निवडणूक झाली.

१९४६: — भारतात अंतरिम सरकारची स्थापना झाली.

१९४५: — व्हिएतनाम देश जपान व फ्रान्सपासून स्वतंत्र झाला.

१९३९: — दुसरे महायुद्ध जर्मनीने पोलंडमधील डांझिग शहर जिंकले.

१९२०: — म. गांधींचे ब्रिटिश सरकारविरुद्ध असहकार आंदोलन.

१९१६: — पटणा उच्च न्यायालयाची स्थापना.

## जन्म

१९८८: इशांत शर्मा — भारतीय क्रिकेटपटू

१९८८: इश्मीत सिंग — भारतीय गायक (निधन: २९ जुलै २००८ )

१९७१: पवन कल्याण — भारतीय अभिनेते आणि राजकारणी

१९६५: पार्थो सेन गुप्ता — भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक

१९५३: अहमदशाह मसूद — अफगणिस्तानचे उपराष्ट्राध्यक्ष व परराष्ट्रमंत्री (निधन: ९ सप्टेंबर २००१ )

१९५२: जिमी कॉनर्स — अमेरिकन लॉन टेनिस खेळाडू

१९४१: साधना — चित्रपट अभिनेत्री

१९३२: अर्नोल्ड ग्रीनबर्ग — स्नॅपलचे संस्थापक (निधन: २६ ऑक्टोबर २०१२ )

१९२४: डॅनियेल अराप मोई — केनिया देशाचे राष्ट्राध्यक्ष

१९२४: स्वामी स्वरूपानंद सरस्वती — भारतीय धार्मिक गुरू आणि शंकराचार्य (निधन: ११ सप्टेंबर २०२२ )

१८८६: श्रीपाद महादेव माटे — साहित्यिक, विचारवंत व समाजसुधारक (निधन: २५ डिसेंबर १९५७ )

१८७७: फेडरिक सॉडी — नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश रसायनशास्त्रज्ञ

१८५३: विल्हेल्म ऑस्टवाल्ड — नोबेल पारितोषिक विजेते जर्मन रसायनशास्त्रज्ञ

## मृत्यू

२०२२: बंबा बक्या — भारतीय पार्श्वगायक (जन्म: ३१ ऑक्टोबर १९८० )

२०२२: टी. व्ही. शंकरनारायणन — भारतीय शास्त्रीय गायक — पद्म भूषण (जन्म: ७ मार्च १९४५

२०२२: रामवीर उपाध्याय — भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार (जन्म: १ ऑगस्ट १९५७ )

२०१४: गोपाल निमाजी वाहनवती — भारतीय वकील आणि राजकारणी (जन्म: ७ मे १९४९ )

२०११: श्रीनिवास खळे — संगीतकार (जन्म: ३० एप्रिल १९२६ )

१९९९: डी. डी. रेगे — चित्रकार व लेखक (जन्म: १७ डिसेंबर १९११ )

१९९०: न. शे. पोहनेरकर — मराठवाड्याचा चालताबोलता इतिहास अशी ओळख असणारे लेखक (जन्म: ३ ऑक्टोबर १९०७ )

१९७६: वि. स. खांडेकर — भारतीय मराठी कादंबरीकार — पद्म भूषण, ज्ञानपीठ पुरस्कार (जन्म: १९ जानेवारी १८९८ )

१९६९: हो ची मिन्ह — व्हिएतनामचे राष्ट्रपती (जन्म: १९ मे १८९० )

१९६०: डॉ. शंकर पुरुषोत्तम आघारकर — वनस्पतीतज्ञ, विज्ञान वर्धिनी महाराष्ट्र या संस्थेचे संचालक




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२ सप्टेंबर**

# १९२० : ब्रिटिश सत्तेला हादरा! महात्मा गांधींचे ऐतिहासिक असहकार आंदोलन

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात १९२० सालाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. याच वर्षी महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारविरुद्ध 'असहकार आंदोलन' सुरू केले. भारतीय जनतेने ब्रिटिश सत्तेला सहकार्य न करता अहिंसक मार्गाने तिचा विरोध करावा, या विचारावर या आंदोलनाची उभारणी झाली. पुढील काळात या आंदोलनामुळे स्वातंत्र्यलढ्याला व्यापक जनाधार मिळाला आणि सामान्य भारतीय नागरिकही स्वातंत्र्य चळवळीशी मोठ्या प्रमाणावर जोडला गेला.पहिल्या महायुद्धानंतर भारतातील राजकीय आणि सामाजिक परिस्थिती अत्यंत अस्थिर होती. ब्रिटिश सरकारने भारतीयांना स्वराज्य देण्याचे आश्वासन दिले होते; मात्र युद्धानंतरही स्वराज्याच्या दिशेने ठोस पावले उचलली गेली नाहीत. त्यातच १९१९ चा रॉलेट कायदा आणि जालियनवाला बाग हत्याकांड यामुळे भारतीय जनतेमध्ये ब्रिटिश सत्तेविरोधात तीव्र संताप निर्माण झाला. या घटनांमुळे गांधीजींचा ब्रिटिश सरकारवरील विश्वास पूर्णपणे ढासळला.या काळात खिलाफत चळवळीचाही प्रभाव होता. मुस्लिम समाजातील नेत्यांनी तुर्कीच्या खलिफाच्या प्रश्नावर ब्रिटिश सरकारविरोधात आंदोलन सुरू केले होते. गांधीजींनी हिंदू-मुस्लिम ऐक्य मजबूत करण्यासाठी खिलाफत नेत्यांना पाठिंबा दिला आणि त्याच काळात असहकार आंदोलनाचा व्यापक कार्यक्रम पुढे आणला.१९२० मध्ये काँग्रेसने असहकार आंदोलनाला मान्यता दिली. या आंदोलनाचा मुख्य उद्देश ब्रिटिश सरकारला भारतीयांच्या सहकार्यापासून वंचित करून त्यांची प्रशासकीय व्यवस्था कमकुवत करणे हा होता. गांधीजींनी जनतेला सरकारी पदव्या व सन्मान परत करणे, सरकारी शाळा-महाविद्यालयांचा बहिष्कार करणे, न्यायालयांपासून दूर राहणे, विदेशी वस्तूंचा बहिष्कार करणे आणि स्वदेशी वस्तूंचा स्वीकार करणे असे आवाहन केले.या आंदोलनात विद्यार्थ्यांनी सरकारी शिक्षणसंस्थांमधून बाहेर पडून राष्ट्रीय शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतला. अनेक वकिलांनी ब्रिटिश न्यायालयांमध्ये काम करणे सोडले. विदेशी कपड्यांची होळी करण्यात आली आणि खादी व चरख्याचा प्रचार मोठ्या प्रमाणावर झाला. त्यामुळे स्वदेशी हा केवळ आर्थिक विचार न राहता स्वातंत्र्यलढ्याचे प्रतीक बनला.असहकार आंदोलनाचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे स्वातंत्र्यलढा शहरांपुरता मर्यादित न राहता गावागावात पोहोचला. शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला, व्यापारी आणि विविध सामाजिक घटक मोठ्या संख्येने या चळवळीत सहभागी झाले. गांधीजींच्या अहिंसा आणि सत्याग्रहाच्या विचारांनी सामान्य जनतेला राजकीय संघर्षात सहभागी होण्याचे धैर्य दिले.

# मराठी साहित्याला ज्ञानपीठाचा मानाचा मुकुट- वि. स. खांडेकर

**पुण्यतिथी विशेष**

वि. स. खांडेकर हे मराठी साहित्यातील एक श्रेष्ठ कादंबरीकार, कथाकार, निबंधकार आणि साहित्यिक म्हणून ओळखले जातात. त्यांचे पूर्ण नाव विष्णू सखाराम खांडेकर. मानवी जीवन, भावना, नैतिक मूल्ये, सामाजिक वास्तव आणि व्यक्तीच्या अंतर्मनाचा वेध घेणारे त्यांचे साहित्य मराठी वाचकांच्या अनेक पिढ्यांवर प्रभाव टाकणारे ठरले. मराठी साहित्यातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानासाठी त्यांना १९७४ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार, १९६८ मध्ये पद्म भूषण आणि १९७४ चा ज्ञानपीठ पुरस्कार असे अनेक मानाचे सन्मान मिळाले.खांडेकरांचा जन्म ११ जानेवारी १८९८ रोजी सांगली येथे झाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी काही काळ शिक्षक म्हणून काम केले. अध्यापनाच्या काळातच त्यांचा साहित्याशी असलेला संबंध अधिक दृढ झाला. पुढे त्यांनी कथा, कादंबरी, लघुनिबंध, रूपककथा आणि समीक्षात्मक लेखन अशा विविध साहित्यप्रकारांत प्रभावी लेखन केले.त्यांच्या साहित्याची खासियत म्हणजे मानवी मनाचा सूक्ष्म अभ्यास. त्यांच्या लेखनातील पात्रे केवळ काल्पनिक व्यक्ती नसून समाजातील विविध स्तरांतील माणसांचे प्रतिनिधित्व करतात. माणसाच्या इच्छा, संघर्ष, नैतिक द्वंद्व, प्रेम, त्याग आणि सामाजिक बंधने यांचा त्यांनी अत्यंत संवेदनशीलपणे विचार केला.त्यांची सर्वाधिक प्रसिद्ध कादंबरी म्हणजे 'ययाती'. महाभारतातील ययातीच्या कथेला आधुनिक मानवी जीवनाच्या संदर्भात मांडत खांडेकरांनी भोग आणि त्याग, इच्छा आणि संयम, सुख



आणि समाधान यांसारख्या मूलभूत प्रश्नांचा विचार केला. 'ययाती'ला १९७४ मध्ये ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला, आणि हा सन्मान मिळवणारे खांडेकर हे पहिले मराठी साहित्यिक ठरले. त्यामुळे मराठी साहित्याला राष्ट्रीय पातळीवर मोठी प्रतिष्ठा मिळाली.खांडेकरांच्या इतर महत्त्वाच्या कादंबऱ्यांमध्ये 'हृदयाची हाक', 'उल्का', 'दोन ध्रुव', 'अमृतवेल' आणि 'क्रौंचवध' यांचा उल्लेख केला जातो. त्यांच्या कथांमधूनही मानवी जीवनातील विविध पैलू प्रभावीपणे समोर आले. त्यांची भाषा साधी, प्रवाही आणि भावनांना स्पर्श करणारी होती. त्यामुळे त्यांचे साहित्य विद्वानांपासून सामान्य वाचकांपर्यंत सर्वांना भावले.१९६८ मध्ये भारत सरकारने त्यांना 'पद्म भूषण' या प्रतिष्ठेच्या नागरी सन्मानाने गौरविले. त्यानंतर ज्ञानपीठ पुरस्कारामुळे त्यांच्या साहित्यिक कर्तृत्वाला देशभरातील सर्वोच्च मान्यता मिळाली. त्यांच्या लेखनाने मराठी भाषेची साहित्यिक समृद्धी आणि अभिव्यक्तीची ताकद राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित केली.१९७६ हे त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीच्या संदर्भात महत्त्वाचे वर्ष मानले जाते, कारण त्यांच्या जीवनातील या कालखंडात ज्ञानपीठासारख्या सर्वोच्च साहित्यिक सन्मानानंतर त्यांचे साहित्यिक योगदान अधिक व्यापकपणे चर्चेत होते. मात्र, एक महत्त्वाची दुरुस्ती अशी की ज्ञानपीठ पुरस्कार १९७६ मध्ये नव्हे, तर १९७४ मध्ये 'ययाती'साठी मिळाला होता; पद्म भूषणही १९६८ मध्ये मिळाला होता.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर
॥ ॐ नमः शिवाय ॥ ॥ श्री दत्तात्रेय नमः ॥ ॥ श्री विठ्ठल रुक्मिणी ॥

# गणेशोत्सवासाठी 'एक खिडकी योजना' सुरू करा

## आमदार अमोल खताळ यांच्या अधिकाऱ्यांना सक्त सूचना



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संगमनेर शहरासह ग्रामीण भागातील विविध समस्या तातडीने मार्गी लावून उत्सव निर्विघ्न, सुरक्षित आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी प्रशासनाने आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात. गणेश मंडळांना विविध विभागांच्या परवानग्या घेण्यासाठी होणारी गैरसोय टाळण्यासाठी संगमनेर नगरपालिकेने तातडीने 'एक खिडकी योजना' सुरू करावी. तसेच शहरातील रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवावेत, अशा सक्त सूचना आमदार अमोल खताळ यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवनातील सभागृहात सोमवारी (दि. ३१) गणेशोत्सवाच्या नियोजनाच्या पार्श्वभूमीवर विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. यावेळी वाहतूक व्यवस्था, रस्ते, वीजपुरवठा, कायदा व सुव्यवस्था, गणेश मंडळांना आवश्यक परवानग्या तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

गणेशोत्सवाच्या काळात सार्वजनिक गणेश मंडळांना विविध विभागांकडून परवानग्या घ्याव्या लागतात. यासाठी मंडळांच्या कार्यकर्त्यांना वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये हेलपाटे मारावे लागतात. ही गैरसोय दूर करण्यासाठी नगरपालिकेने 'एक खिडकी योजना' सुरू करून मंडळांना आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या एकाच ठिकाणी उपलब्ध करून द्याव्यात, अशी सूचना आमदार खताळ यांनी केली.

पावसामुळे शहरातील अनेक रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांची तसेच वाहनांची वर्दळ वाढणार असल्याने या खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नगरपालिका प्रशासनाने शहर व उपनगरातील रस्त्यांची तातडीने पाहणी करून खड्डे बुजविण्याचे काम युद्धपातळीवर हाती घ्यावे, असे निर्देश त्यांनी दिले. शहरासह उपनगरातील प्रमुख रस्त्यांवर मोकाट जनावरांचा वावर वाढला असून, त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. गणेशोत्सवात वाहतूक वाढणार असल्याने मोकाट जनावरांचा बंदोबस्त करून नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशा सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

गणेश मंडळांकडून विविध ठिकाणी देखावे, कमानी व विद्युत रोषणाई केली जाते. अशा वेळी रस्त्यांवरील किंवा वस्त्यांमधील लोंबकळणाऱ्या वीजतारा धोकादायक ठरू शकतात. त्यामुळे महावितरणने अशा ठिकाणांची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी. गणेशोत्सवाच्या काळात वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी विशेष दक्षता घ्यावी.

गणेशोत्सव शांततेत पार पडण्यासाठी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याला प्राधान्य देण्यात यावे. शहर व ग्रामीण भागातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती घेऊन त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करावी. संवेदनशील ठिकाणी पोलिसांची गस्त वाढवावी तसेच गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी समन्वय ठेवून उत्सव काळात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घ्यावी.

बैठकीस संगमनेर उपविभागाचे उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, महावितरणचे कार्यकारी अभियंता नारायण सोनवणे, उपअभियंता नामदेव शेळके, मुख्याधिकारी दयानंद गोरे, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, शहर पोलीस निरीक्षक समीर बारवकर, तालुका पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# भुरळ पाडून विवाहित तरुणीवर अत्याचार

## तरुणाविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील बसस्थानक परिसरातून एका २० वर्षीय विवाहित तरुणीला भुरळ पाडून दुचाकीवर बसवून खांडगाव परिसरातील डोंगर भागात नेऊन तिच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केल्याची धक्कादायक घटना बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडल्याचा आरोप आहे. या घटनेप्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून सिद्धांत दीपक मावस (रा. कुरण रोड, संगमनेर) याच्याविरुद्ध बलात्कारासह गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी सिन्नर परिसरात राहते. तिचे माहेर राजूर असल्याने ती रक्षाबंधनानिमित्त दि. २६ ऑगस्ट रोजी सकाळी राजूर येथे गेली होती. भावंडांसोबत रक्षाबंधनाचा कार्यक्रम आटोपल्यानंतर ती दुपारी बसने सिन्नरकडे परतत होती. संगमनेर येथे पोहोचल्यानंतर तिने पतीला फोन करून बसस्थानकावर घेण्यासाठी बोलावले आणि ती तेथे त्यांची वाट पाहत थांबली. दरम्यान, नाश्ता करण्यासाठी ती बसस्थानक परिसरातील एका हॉटेलमध्ये गेली असता आरोपीची तिच्यावर नजर पडली. त्याने दुचाकी आडवी लावून तिला गाडीवर बसण्यास सांगितले. मात्र, तरुणीने नकार दिला. त्यानंतर आरोपीने तिचा पाठलाग केल्याचा आरोप आहे. त्याच्या त्रासाला कंटाळून तरुणी दूर जाण्याचा प्रयत्न करत असतानाच आरोपीने तिला भुरळ पाडून दुचाकीवर बसवले आणि खांडगाव परिसरातील डोंगर भागात नेले. तेथे तिच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केल्याचा आरोप तिने तक्रारीत केला आहे.

घटनेनंतर पीडित तरुणी पुन्हा बसस्थानक परिसरात आली. काही काळानंतर तिला आपल्यासोबत नेमका काय प्रकार घडला, याची जाणीव झाली. ती अस्वस्थ असल्याचे पतीच्या लक्षात आल्यानंतर त्याने विचारणा केली. त्यावेळी तिने पतीला घडलेला प्रकार सांगितला.

यानंतर पती-पत्नीने संबंधित तरुणाचा शोध घेण्यास सुरुवात केली. दि. ३० ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास संशयित बसस्थानक परिसरात आढळून आला. काही नागरिकांच्या मदतीने त्याला पकडण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यावेळी त्याने आपले नाव सांगितल्यानंतर हाताला हिसका देऊन तेथून पळ काढल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकारानंतर पीडित तरुणीने थेट संगमनेर शहर पोलीस ठाणे गाठून पोलिसांना संपूर्ण घटना सांगितली. तिच्या तक्रारीवरून सिद्धांत दीपक मावस याच्याविरुद्ध बलात्कारासह गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेचा पुढील तपास संगमनेर शहर पोलीस करीत आहेत.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# मराठा पतसंस्थेच्या संगमनेर शाखेच्या स्थलांतरित कार्यालयाचे बुधवारी उद्घाटन

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

मराठा सेवा संघ प्रणित मराठा पतसंस्था मर्या. अहिल्यानगरच्या संगमनेर शाखेच्या स्थलांतरित कार्यालयाचा उद्घाटन समारंभ शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजता सावतामाळीनगर येथील पेन्शनर्स भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यालयाचे उद्घाटन आमदार अमोलभाऊ खताळ यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक सोमनाथ तात्याबा कळसकर गुरूजी राहणार आहेत.

कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते ॲड. बापुसाहेब गुळवे, रामेश्वर पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन रोहिदासजी डेरे, माजी विभागीय वनाधिकारी शिवाजीराव फटांगरे, संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष दशरथ गव्हाणे, जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, ज्येष्ठ नेते एस.झेड. देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपील पवार, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, दै. युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष विवेक लव्हाट, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष आबासाहेब थोरात यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरउपस्थित राहणार आहेत.

यावेळी शिक्षक दिनानिमित्त विशेष सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. इतिहास अभ्यासक प्रा. शिवश्री जयसिंग सहाणे, माजी प्राचार्य एम. एम. फटांगरे आणि जि.प. शिक्षण विभागाचे माजी केंद्रप्रमुख बी.आर. नागरे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार केला जाणार आहे. कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन संचालक काशिनाथ डोंगरे, व्हा. चेअरमन ज्ञानेश्वर अनभुले, संस्थापक चेअरमन विजयकुमार ठुबे, शाखाधिकारी अशोक अरगडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड तसेच संचालक मंडळ, शाखा कमिटी, सभासद व कर्मचारी वृंद यांनी केले आहे

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

मार्स युनिव्हर्स प्रायव्हेट लिमिटेड
टूर्स, ट्रॅव्हल्स आणि कॉर्पोरेट सर्व्हिसेस
तुमचे पाऊल मंगळावर ठेवण्यासाठी मार्स युनिव्हर्स सज्ज
प्रति व्यक्ती 59,000/-* (फुकेत, बँकॉक)
प्रति व्यक्ती 79,000/-* (व्हिएतनाम, सिंगापूर, बाली)
आंतरराष्ट्रीय टूर पॅकेजेस | कॉर्पोरेट इव्हेंट मॅनेजमेंट | मिटींग्स, इन्सेंटिव्ह टूर्स | विश्वसनीय सेवा उत्तम नियोजन
1 ला ग्रुप - 26 सप्टेंबर
2 रा ग्रुप - 1 ऑक्टोबर
3 रा ग्रुप - 10 ऑक्टोबर
संपर्क - किशोर सोनवणे 9309429705

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25